**<u>तक्रारदारां तर्फे साक्षीदार क्र. १.</u>**

**<u>मी शपथेवर कथन करतो की,</u>**

**नाव –** मारुती महादेव गुरव.

**वय** – ७४ वर्ष, **व्यवसाय** – मजूरी,

**राहणार** – कासारकांडगाव, ता. आजरा, जि. कोल्हापूर.

**<u>सरतपास – श्री. एस. एम. नाईकवडे, वकील.</u>**

**१.** मी कासारकांडगांव येथे माझ्या पत्नीसह राहतो. माझा मुलगा मुंबईला नोकरी करतो. आरोपी क्र. १ माझा मोठा भाऊ असून आरोपी क्र. २ त्याचा मुलगा आहे. आमचे कासारकांडगांव येथे वडीलार्जित घर–परडे व गट क्र. १२६, १२७, १२९, १३० आणि १३४ मध्ये शेतजमीन आहे. आमच्यामध्ये सदर मिळकतींचे वाटप झालेले नाही. आरोपी क्र. १ त्या जागेवरती घर बांधणेचा विचार करत होता. त्यावेळी मी वाटणी मागितली होती.

**२.** आरोपी क्र. १ मुंबईला होता, त्यावेळी मी गावाकडें शेती करत होतो. मी १९७५ च्या दरम्यान मुंबईला गेलो होतो. मी तेथे चार वर्षे टाटा मिल मध्ये काम केले होते. त्यावेळी आरोपी क्र. १ वरती शस्त्रक्रिया झाल्या होत्या. तेव्हा मी व आरोपी क्र. १ एकत्र रहात होतो. त्यानंतर आमच्यामध्ये वाटण्यांबाबत कुरघोडी चालू झाल्या होत्या. त्यामुळे चार वर्षापुर्वी ९ तारखेला ६ व्या महिन्यात आमची संतोष गुरव, नारायण सरदेसाई, शिवाजी गुरवची पत्नी, माझी पत्नी व आम्ही भाऊ यांच्यात रात्री ९ ते ९.३० वा. दरम्यान बैठक झाली होती.

**३.** आमची घर, शेती व इतर दागिने आणि पैशांबाबत चर्चा चालू होती. आरोपी क्र. २ ने माझ्या १५,०००/– च्या मेसकाठया विकल्यामुळे मी त्याच्याकडे अर्ध्या रक्कमेची मागणी केली होती. आरोपी क्र. १ ने माझ्या पत्नीच्या सोन्याच्या पुतळया दुरूस्तीसाठी मुंबईला नेल्या होत्या. त्याने त्या पुतळया आम्हाला परत दिल्या नव्हत्या.

**४.** आमची आई १९९९ साली वारली आहे. त्यावेळी मी व आरोपी क्र. १

बोलत असताना आरोपी क्र. २ ने येवून माझ्या तोंडावर मारले होत. संतोषने त्याला आडवायचा प्रयत्न केला असता तो हत्यार आणायला गेला होता. त्यांनतर मी व संतोषने पोलीस चौकीला जावून तक्रार दिली होती. पोलीसांनी आम्हाला दुस–या दिवशी यायला सांगून बसवून ठेवून कोणतीही कारवाई केली नाही. मी पोलीसांकडे दिलेल्या तक्रारीची प्रत ओळखू शकतो. आता मला ती दाखवली. तिला वस्तू क्र. अ देण्यात येतो. पोलीसांनी माझ्या तक्रारीवरती कोणतीही कारवाई केलेली नसल्यामुळे मी न्यायालयात तक्रार दाखल केलेली आहे. माझी आरोपी क्र. २ ला शिक्षा व्हावी अशी ईच्छा आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – श्री. एस. एस. इंजल, वकील.**

**५.** मुदतीचा अर्ज मंजूर.

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

दिनांक – १४.११.२०२५. **(आर. पी. थोरे)**

आजरा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, आजरा.